MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



मातोश्री येथे युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे व उपनेत्या सुषमा अंधारे यांच्या उपस्थितीत बीडचे विद्यार्थी चळवळीतील युवा नेतृत्व ओम राख यांनी युवा सेनेत प्रवेश केला. यावेळी अनिकेत शिंदे, अमोल घुले, किशोर घुले, संदीप तांदळे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -३५ | मंगळवार दि.२२ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -35 | TUESDAY DT.22 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# मनोज जरांगे पाटलांना बीड जिल्ह्यात शरद पवारांच्या राष्ट्रवादी कडून घेरण्याचा डाव?











## कुंडलिक खांडे राजेंद्र मस्केचे मनो मिलन झाले का बीड विधानसभेत चर्चा?

बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्रामध्ये २०२४ च्या लोकसभेच्या निवडणुकीनंतर सर्वच पक्ष जागून खडबड झाले आहेत जातीच्या राजकारणाचा विषाचा महाराष्ट्रामध्ये पसरलेला असतानाच महाविकास आघाडी कोणाचा नवीन राजकीय कुरगुडीला सुरुवात झालेली आहे ती म्हणजे मनोज दादा जरांगे पाटील यांनी आता लढायचं आणि पाडायचं हे दोन्ही निर्णय घेतलेले आहेत आणि मनोज दादा जरांगे पाटील यांनी उमेदवार अर्ज सर्वांनीच भरा २९ तारखेला सांगे त्यांनी काढून घ्यावे लागतील असा आदेश दिल्यानंतर मराठा समाजामध्ये एक मराठा लाख मराठा च्या घोषणांनी परिसर जणांना त्या ठिकाणी मात्र आता शरद पवारांची राष्ट्रवादी ही नवीन एक खेळ खेळी करू लागली आहे या खेळीमध्ये शिवसंग्राम यांनी ज्योती मेटे रमेश आडसकर आणि राजेंद्र मस्के कुंडलिक खांडे बीबी जाधव दिलीप गोरे याची नवी खेळी आता शरद पवारांची राष्ट्रवादी ही मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उमेदवाराला घेरण्यासाठी व शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवारांना पाठिंबा देत त्या ठिकाणी शरद पवारांचे उमेदवार मनोद दादा जरांगे पाटील यांच्या शब्दावर निवडून आणायचे व लोकांत सब भ्रम निर्माण करायचा अशी परिस्थिती सध्या बीड जिल्ह्यामध्ये पाहायला मिळत आहे. परंतु यानंतर जर असे झाले तर मनोज जरांगे पाटील यांच्या शब्दाला आता यानंतर किंमत राहणार नाही? मनोज दादा जरांगे पाटील हे मराठा समाजाचे श्रद्धास्थान आहेत मनोज दादा जरांगे पाटील यांचा शब्द अंतिम असेल असेही बीड मतदार संघातील जनता सांगत आहेत म्हणून मनोज दादा जरांगे पाटील सांगतील ते धोरण आणि तेच तोरण असेल त्यामुळे ज्योती मेटे राजेंद्र मस्के रमेश आडसकर बीबी जाधव दिलीप गोरे कुंडलिक खांडे यांनी किती जरी शरद पवारांच्या माध्यमातून खेळी केल्या तरी मनोज दादा जरांगे पाटील सांगतील त्याच उमेदवाराला आम्ही मतदान करणार आहोत त्यामुळे ज्योती मेटे रमेश आडसकर कुंडलिक खांडे बीबी जाधव दिलीप गोरे राजेंद्र मस्के यांचा राष्ट्रवादीमध्ये शेवटी काहीच पक्ष प्रवेश करून फायदा होणार नाही शरद पवार हे निष्ठावंत असलेले संदीप क्षीरसागर यांना पाठिंबा देतील हे चित्र स्पष्ट झालेले आहे आणि बीडची उमेदवारी बीड विधानसभेत संदीप क्षीरसागराना मिळण्याचे संकेत शरद पवारांनी दिले आहेत. अशी विश्वासने सूत्रांनी माहिती सिल्वर वरून दिलेली आहे


मनोज जरांगे पाटील यांनी जिथे जिथे आपले उमेदवार निवडून येतील तेथे तेथे आपले उमेदवार निवडून आणा आणि उमेदवारी अर्ज दाखल करा असं म्हटल्यानंतर शरद पवारांनी बीड जिल्हा टारगेट केला असून मनोज जरांगे पाटलांच्या उमेदवारांना पाडण्याची खेळी ज्योती मेटे राजेंद्र मस्के रमेश आडसकर बीबी जाधव दिलीप गोरे यांनी खेळी करत असल्याचे चित्र बीड जिल्ह्यातील जनतेला स्पष्ट दिसत असल्यामुळे त्याचाच उदाहरण म्हणून ज्योतीताई मेटे राजेंद्र मस्के बीबी जाधव दिलीप गोरे अशा मराठा चेहऱ्यांना त्यांनी त्यांच्या पक्षात प्रवेश देऊन जरी मनोज जरंगे पाटलांनी उद्या स्वतःचा उमेदवार द्यायचा ठरवला तर त्यांना घेरण्याचा डाव शरद पवार यांनी टाकले असून शरद पवारांना काही केले तरी बीड जिल्ह्यात त्यांचे उमेदवार निवडून आणायचे असून म्हणून मनोज जरांगे पाटील यांच्या नावाचा उपयोग जर झाला तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला फायदा होईल आणि यानंतर मनोज दादा जरांगे पाटील शब्दाला किंमत राहणार नाही असं चित्र बीड जिल्ह्यामध्ये स्पष्ट दिसत आहे अशी चर्चा बीड व माजलगाव विधानसभेमध्ये व जिल्ह्यामध्ये सध्या लोका मध्ये ऐकायला मिळत आहे.?

ज्योती मेटे राजेंद्र मस्केला शरद पवारांनी ठणकावून सांगितले बीड विधानसभेतून संदीपच उमेदवार.

ज्योती मेटे राजेंद्र मस्के यांनी राजकीय खेळी करत शहरात पवारांना संदीप क्षीरसागर उमेदवारी देऊ नये अशी मागणी करतात शरद पवारांनी सांगितलं की पडत्या काळामध्ये संदीप क्षीरसागरे माझ्यासोबत राहिलेले आहेत संदीप क्षीरसागर बीडचे विधानसभेचे उमेदवार असतील माझं बीड विधानसभेतले एक सीट निवडून आलं तरी आणि नाही आलं तरी मी संदीप क्षीरसागर उमेदवारी देणार की काळ्या दगडावरती पांढरे वेग असल्यामुळे शरद पवारांनी यांना ठणकावून सांगितल्यामुळे ज्योती मेटे राजेंद्र मस्के यांच्या स्वप्नावर आता पाणी पडणार आहे. ज्योती मेटे राजेंद्र मस्के यांना संदीप क्षीरसागर यांचेच काम करावं लागणार

- ज्योती मेटे राजेंद्र मस्के रमेश आडसकर बी बी जाधव दिलीप गोरे कुंडलिक खांडे शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये डेरे दाखल होत असतानाच मनोज दादा जरांगे पाटील यांच्या अडून मत फोडण्याचा वरील मंडळींचा डाव?बीड जिल्ह्यात शरद पवारांची राष्ट्रवादी च खुळखुळ होऊन शरद पवार घायाळ झाल्यानंतर आता त्यांना पुन्हा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आडून आपले सहा मतदारसंघांमध्ये निवडणुकीतील उमेदवारांना मनोज जरांगे यांच्या शब्दाचा फायदा करून घेण्यासाठी शरद पवार गट सज्ज होऊन मनोज जरांगे यांच्या उमेदवाराला घेण्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाकडून बीड जिल्ह्यामध्ये होत आहे.?
- ज्योती मेटेना शरद पवारानी सांगितले की जर समोरून ओबीसी चेहरा म्हणून संदीप क्षीरसागर किंवा अन्य ओबीसी उमेदवारदिला तर त्या ठिकाणी तुम्हाला त्यांचं उमेदवाराचं काम करावंच लागेल त्या अटीवरच त्यांना राष्ट्रवादी प्रवेश दिल्याची

- **मनोज दादा जरांगे पाटील सावधान?**
- **मनोज जरांगे पाटलांनी महायुती महाविकास आघाडीच्या निवडून येणाऱ्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचे घोषित केले असताना ज्योती बेटे राजेंद्र मस्के कडून राजकीय षडयंत्र जरांगे पाटलांनी वेळीच आपला कोण आहे हे ओळखणे गरजेचे ?**
- **मनोज जरांगेच्या भेटीनंतर राजेंद्र मस्केंनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करण्याची काय गरज होती मराठा बांधवांमध्ये चर्चेला उधाण?**
- **मनोज जरांगेना घेरण्यासाठी शरद पवारांची राष्ट्रवादी ज्योती मेटे राजेंद्र मस्के रमेश आडसकर बीबी जाधव दिलीप गोरे कुंडलिक खांडे सज्ज?**
- **मनोज जरांगे पाटीलानी सांगितलं सर्वांनी फॉर्म भरा जिथ त्या विधानसभेत पक्षाचा निवडून येण्यासारखा उमेदवार असेल त्याच्या पाठीशी उभे राहणार पण या शब्दाचा गैरफायदा बीड ज्योती मेटे राजेंद्र मस्के बीबी जाधव रमेश आडसकर दिलीप गोरे कुंडलिक खांडे घेऊ लागले बीड माजलगाव मतदार संघात चर्चेला उदान?**
- **मनोज जरांगे पाटीलाच्या नावाचा दुरुपयोग करत ज्योती मेटे राजेंद्र मस्के बीबी जाधव रमेश आडसकर दिलीप गोरेची नवीन राजकीय कुरघोडी?**



# चारशे रुग्णांची तपासणी,मोफत नेत्र तपासणी शिबीर

**प्रतिनिधी ।** अंबाजोगाई

आनंदऋषि नेत्रालय, अहिल्यानगर , रोटरी क्लब अंबाजोगाई यांच्या वतीने रविवारी रोटरी कार्यालयात मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरात चारशे रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.यातील नेत्रदोष असणाऱ्या रुग्णांवर मोतीबिंदू व इतर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. नेत्र तपासणी शिबिराचे उद्घाटन प्रांतपाल सुरेश साबू व सौ.निर्मला साबू यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.यावेळी मोईन शेख,काळे,आनंद जाजू, धनराज सोळंकी, मोहिते, कल्याण काळे यांची उपस्थित होते यावेळी बोलताना प्रांतपाल सुरेश साबू म्हणले की अंधत्व निर्मूलनाची मोहीम हाती घेतली आहे.संपूर्ण तालुका अंधमुक्त करण्यासाठी आमचा (रोटरीचा) पाठपुरावा सुरूच राहणार आहे. ही मोहीम वर्षभर राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी आनंदऋषि नेत्रालय यांचा समुह नेत्र विशारद कुंडलिक राठोड,किरण कवडे यांनी चारशे जणांची नेत्र तपासणी केली. यातील नेत्रदोष असणाऱ्या रुग्णांवर अहिल्यानगर येथील आनंदऋषि नेत्रालय येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व इतर आवश्यक शस्त्रक्रिया होणार आहेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुहास काटे यांनी केले आनंद कर्णावट,डॉ.सुरेश अरसुडे,स्वप्नील परदेशी ,प्रवीण चोकडा,राजेंद्र घोडके,शाम भन्साळी,ड.अनिल लोमटे,मंजुषा जोशी, स्वरुपा कुलकर्णी,बालाजी घाडगे,रुपेश रामावत,गोपाळ पारीख, बाळासाहेब कदम,रमेश देशमुख,सचिन बेंबडे,गणेश राऊत,शेख शकील,भीमाशंकर शिंदे,सुरेश देशमुख, यांच्या सह रोटरी क्लब चे सदस्य उपस्थित होते.

आनंदऋषि नेत्रालय यांच्या वतीने दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी मोफत नेत्र तपासणी शिबिर घेण्यात येईल.

# माजलगाव मतदार संघात नेतेमंडळींचा गावागावांत भेटींचा सपाटा

## आमदारकीसाठी सोळंके, आडसकर, जगताप, डक, निर्मळ, मुंडे यांच्यसह समर्थकही लागले प्रचाराला, गावांमध्ये बैठकांचे सत्र सुरु

**प्रतिनिधी ।** गेवराई



महाविकास आघाडी, महायुतीमध्ये समाविष्ट असलेले व मित्र पक्षातील नेते मंडळी आपल्यालाच उमेदवारी मिळणार असे गृहीत धरून नेत्यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघातून प्रचाराला सुरूवात केल्याचे तर नेत्यांचा गावागावात भेटीचा सपाटाही सुरु केल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे. समर्थकांद्वारे मतदारांशी थेट संवाद साधण्यासाठी गावागावात बैठकांचा धडाका वाढला आहे. विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली, येत्या काही दिवसात निवडणुक

प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यकर्ते व नेते कामाला लागणार आहेत, तत्पूर्वी कार्यकर्त्यांची लगबग सुरू झाली असून, या घडामोडींमुळे राजकीय वातावरण ढवळू लागले आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता १५ ऑक्टोबरपासून सुरु झाली आहे. सोबतच निवडणुकीची २० नोव्हेंबर ही तारीख घोषित होताच विविध पक्षातील व अपक्षातील इच्छुक उमेदवारांनी माजलगाव मतदारसंघात गावनिहाय बैठकांचे सत्र सुरू केले आहे. विद्यमान लोकप्रतिनिधींसह त्यांचे पुतणे हि काकांसोबत गाव गावात भेटींचा सपाटा लावताना दिसत आहेत तर काही दिग्गज व प्रभावी उमेदवारांना तिकिटाची आशा असल्यामुळे विद्यमान आमदार प्रकाश सोळुंके व त्यांचे पुतणे जयसिंग सोळंके, रमेश आडसकर, मोहन जगताप, नारायण डक, माधव निर्मळ, बाबरी मुंडे, शेख मंजूर या सर्व

नेते मंडळींनी कुठलाही वेळ न दवडता आतापासूनच मतदारसंघातील मतदारांशी संवाद साधण्याला वेग दिला आहे. महायुती, महाविकास, वंचित बहुजन आघाडी या आघाडीच्या, महायुतीच्या माध्यमातून गावागावात कार्यकर्त्यांची मजबूत फळी उभारलेल्या लोकप्रतिनिधींसह इच्छुकांनी कार्यकर्त्यांना कामाला लावले आहे. इच्छुक उमेदवार गावात गेल्यावर सार्वजनिक ठिकाणी अथवा एखाद्या कार्यकर्त्याच्या घरात बसून गावातील ज्येष्ठ नागरिकांसोबत चर्चा करताना दिसत आहेत. या बैठकांमुळे ग्रामीण भागातील राजकीय वातावरण तापायला सुरूवात झाली आहे.विकासाच्या मुद्यावर भर गावांमधील बैठकांत प्रामुख्याने विकास कामांना प्राधान्य दिल्या जात आहे. यामध्ये पिण्याच्या पाण्याची योजना, स्मशानभूमी, धारूर घाट रुंदीकरण,सुशिक्षीत बेरोजगार व महिलांच्या हाताला काम देणाऱ्या विविध योजना व रस्ते, पाणंद रस्ते विविध कामाबाबत चर्चा करुन मतदारांना लोकप्रतिनिधी सह भावी उमेदवारांचे समर्थक आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. याशिवाय भावनिक मुद्यांना हात घालून मतदारांना साद घालण्याचा प्रयत्नही केला जात आहे. मीडियाचा वापर वाढला इच्छुकांकडून सोशल महाविकास आघाडी, महायुती, वंचित, तिसरी आघाडी प्रामुख्याने निवडणूक रिंगणात उतरणार आहेत

जरांगे पाटील यांच्या भूमिकाकडे सर्वांचे लक्ष

या माजलगाव विधानसभा मतदारसंघात मराठा आंदोलक मनोज जरांगे काय भूमिका घेणार हे अद्यापही स्पष्ट नाही त्यामुळे सर्वांचे लक्ष लागले आहे. आघाडी, युती यांना डावलून काही नेते 'अपक्ष' म्हणून निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचे संकेत सोशल मीडियाच्या माध्यमातून मिळत आहेत.

नेत्यांच्या पक्षबदलांच्या चर्चा विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर महायुती, महाविकास आघाडीच्या इच्छुकांमध्ये चलबिचल सुरू आहे. युती तसेच आघाडीमध्ये जागा सुटण्याची शक्यता लक्षात घेता अनेक नेत्यांनी उमेदवारीसाठी पर्याय शोधणे सुरू केले. तसेच विविध प्रमुख पक्षातील नेते पक्ष बदलतील, अशीही चर्चा सुरु.

# राज्यातील शेकापच्या पारंपरिक जागा न दिल्यास महाविकासआघाडीतुन बाहेर पडू - भाई मोहन गुंड

### बीड येथे महत्त्वपूर्ण बैठक संपन्न पक्षाने आदेश दिल्यास सहा जागेवर लढणार- विष्णुपंत घोलप

**प्रतिनिधी ।** बीड




निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाच्या बीड जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक काल बीड येथे आयोजित करण्यात आली होती. बैठकीमध्ये राज्यभर चालू असलेल्या सर्व राजकीय घडामोडींची चर्चा करण्यात आली.लोकसभा निवडणुकीमध्ये शेतकरी कामगार पक्षात सह डाव्या पक्षाच्या कुठल्याही नेत्यांनी लोकसभेसाठी हट्ट न धरता जातीवादी सरकार पटले पाहिजे या भावनेतून महाविकास आघाडीला निस्वार्थपणे मदत केली मात्र आज विधानसभेच्या वेळी जागा वाटपामध्ये शेकापच्या पारंपारिक असणाऱ्या मतदारसंघांमध्ये देखील शिवसेना,राष्ट्रवादी आणि काँग्रेस जागा देण्यास मोठेपणा दाखत नाहीत,जाणीवपुर्वक कोंढी केली जात असल्याची चर्चा या बैठकीत करण्यात आली जर आपल्याला पारंपरिक जागा मिळत नसतील तर आपण बीड जिल्ह्यामध्ये सहाची सहा जागेवर उमेदवार देऊ असा ठरवा मांडण्यात आला, राज्यभर निवडुंन येण्याची संख्या जरी ठरावीक ठीकणी आसली तरी महाविकास आघाडीला विजयाची लागणारी मत मात्र शेतकरी कामगार पक्षाकडे आहेत, हे हे महाविकास आघाडीच्या लोकांनी विसरू नये अन्यथा आघाडीतून बाहेर पडून बीडसह मराठवाड्यातल्या जागा लढू असे भाई मोहन गुंड यांनी व्यक्त केले, यावेळी भाई विष्णुपंत घोलप , आभी लोंढे , भाई बाळासाहेब घुमरे, ड नारायण गोले पाटील ड राजेंद्र नवले, इम्रान शेख भाई अशोक रोडे, शिवाजी सुरवसे भाई मुंजा पांचाळ प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# अण्णासाहेब राठोड यांनी घेतली सुप्रियाताई सुळे यांची भेट

### गेवराईची जागा तुतारीला सोडवण्यासाठी आग्रह!

**प्रतिनिधी ।** गेवराई

गेवराई : बीड लोकसभेला गेवराई तालुक्यातीत प्रस्थापित नेते सोबत नसतानाही गेवराई तालुक्यातील शरद पवार गटाच्या उमेदवाराला ३९ हाजारांचे मताधिक्य मिळाले यामध्ये अण्णासाहेब राठोड यांचा सिंहाचा वाटा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष यांनी लोकसभेमध्ये तन-मन धनाने पक्षाशी एकनिष्ठ राहत लोकसभेमध्ये तालुक्यातून लीड मिळवून दिली याचा फायदा येत्या विधानसभेमध्ये पक्षाचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांना होईल अशा आशेने बंजारा समाजातील संत महंतांनी मुंबईतील सिल्वर ओक येथे शरदचंद्रजी पवार यांची काही दिवसापूर्वी भेट घेऊन गेवराई ची जागा बंजारा समाजातील राष्ट्रवादी पक्षाचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांना देण्यात यावी अशी मागणी केली. याच अनुषंगाने दि. १८ ऑक्टोबर रोजी तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी खासदार सुप्रियाताई सुळे यांची मुंबई येथे भेट घेतली व त्याच बरोबर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे यांना भेटून विविध विषयांवर चर्चा केली व गेवराई विधानसभा ची जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या तुतारीला सोडून घेण्यात यावे अशी विनंती केली. यावेळी तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांची कार्य अहवाल पुस्तिका सुप्रियाताई सुळे यांना देण्यात आली.याबाबत सविस्तर वृत्त असे की, युती सरकारबद्दल जनतेमध्ये संताप आहे, हे दाखवण्यात शरद पवार यशस्वी ठरले आहे. तसेच, गेल्या दोन वर्षांतील युती सरकारची जनतेचे प्रश्न सोडवण्याबद्दलची तळमळ म्हणावी तितकी दिसून आली नाही, याचा फायदा आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला होणारा असून आत्ताच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये हे चित्र स्पष्ट झाले होते. महाविकास आघाडी मधील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे गेवराई तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड हे निवड झाल्यापासून पक्ष वाढीसाठी अहोरात्र प्रयत्न करत आहेत. जसजशी विधानसभा निवडणूक जवळ येऊ लागली आहे तसतशी गर्दी राष्ट्रवादी संपर्क कार्यालयामध्ये



होऊ लागली आहे. तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड योग्य माणसाची योग्य पदावर निवड करत असून त्यामुळे पक्ष मजबूत होत असून याचा फायदा विधानसभा निवडणुकीमध्ये होईल. महिनाभरात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादीने (शरद पवार गट) कंबर कसली आहे. तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड हे भेटी गाठी च्या माध्यमातून पक्षसंघटना मजबूत करताना दिसत असून गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये त्यांनी जातीने लक्ष घालण्यास सुरूवात केली आहे. या सर्वांचा कार्य अहवाल तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी मुंबईतील सिल्वर ओक येथे शरदचंद्रजी पवार यांच्या समोर मांडला होता. यावेळी बंजारा समाजातील संत महंत उपस्थित होते या सर्वांनी गेवराई विधानसभेची जागा अण्णासाहेब राठोड यांना देण्यात यावी अशी मागणी यावेळी केली होती या मागणीला प्रतिसाद देत राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांनी लवकरच याबाबत घोषणा करण्यात येईल असे सुतवाच यावेळी उपस्थित महाराज मंडळी समोर केले होते. याच अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी दिनांक १८ ऑक्टोबर रोजी खासदार सुप्रियाताई सुळे यांची मुंबई येथे भेट घेऊन गेवराई विधानसभा मतदारसंघाची जागा महाविकास आघाडी मधून शरद पवार गटाला सोडावी अशी विनंती केली त्याच बरोबर प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे यांना भेटून विविध विषयांवर चर्चा केली व यासह अनेक बाबीवर चर्चा केली.

# विधानसभा निवडणुकी पुर्वी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची यूवासेनेची फौज तैयार-जिल्हाप्रमुख



**प्रतिनिधी ।** बीड

शिवसेनेचे पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब व युवा सेनेचे प्रमुख सन्माननीय आदीत्यजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व शिवसेनेचे संपर्क नेते सुनीलजी प्रभू साहेब, युवा सेनेचे वरूणजी देसाई, मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब, संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव साहेब, सहसंपर्क प्रमुख बदामराव आबा पंडित,सहसंपर्कप्रमुख डॉ. लक्षराज सानप साहेब,सह संपर्क प्रमुख बाळासाहेब जी अंबुरे व युवा सेनेचे विनायक जी चोथे साहेब यांच्या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख परमेश्वर जी सातपुते यांच्या शिफारशीनुसार माजलगाव व आष्टी विधानसभा मतदारसंघ कार्यक्षेत्रात,(माजलगाव,आष्टी विधानसभा) जिल्हा युवाधिकारी अभिषेक दिवे, उप जिल्हा युवाधिकारी कृष्णा चौरे, उपजिल्हा युवाधिकारी वचिष्ठ शेंडगे, उपजिल्हा युवाधिकारी अरुण कुडलीक, माजलगाव विधानसभा युवाधिकारी सचिन धपाटे,वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथ मोरे, शिरूर तालुका युवाधिकारी साईनाथ ढाकणे, पाटोदा तालुका युवाधिकारी अजिंक्य डोरले,आष्टी तालुका युवाधिकारी शिवप्रसाद जाधव, धारूर तालुका युवाधिकारी रोहित फावडे, माजलगाव तालुका युवाधिकारी प्रदीप तांबे, आष्टी शहर युवाधिकारी रंगनाथ आजबे, पाटोदा शहर युवाधिकारी जावेद शेख, धारूर शहर युवाधिकारी रोहित फावडे, वडवणी शहर युवाधिकारी भैय्या खोसे, वडवणी तालुका संघटक आण्णासाहेब शिंदे, वडवणी उप तालुका युवाधिकारी अविनाश बोंद्रे, वडवणी उप तालुका युवाधिकारी शुभम मस्के, वडवणी उपतालुका युवाधिकारी गणेश जोगदंड, वडवणी शहर संघटक सुनील शिंदे या सर्व पदाधिकार्यांच्या वरील प्रमाणे नीवडी करण्यात आलेल्या असुन आज शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने मनपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस मनपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलतांना जिल्हाप्रमुख म्हणाले की आपल्याला दिलेल्या पदाचा उपयोग,सामाजिक कार्य,पक्ष संघटना वाढीसाठी करुण युवासेना संघटना मजबुत करण्यासाठी कामाला लागावे.

याप्रसंगी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथजी खेडकर, शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, पाटोदा तालुका प्रमुख मुकुंद शिंदे सह सर्व शिवसैनिक उपस्थित होते...!!

# वंचित बहुजन आघाडी धारूर तालुका आयोजित कार्यकर्ता मेळावा संपन्न



**प्रतिनिधी ।** किल्ले धारूर

वंचित बहुजन आघाडी माजलगाव मतदार संघाचे अधिकृत उमेदवार शेख मंजुर यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा धारूर शहरातील आर्या फंक्शन हॉल येथे संपन्न झाला दलित -मुस्लिम-आदिवासी-ओबीसी समूहामध्ये शेख मंजुर यांच्या उमेदवारीने अतिशय उत्साहाच वातावरण तालुक्यामध्ये निर्माण झालेले आहेत. या बैठकीत प्रास्ताविकपर तालुकाध्यक्ष इंजि. प्रशांत उघडे यांनी बोलताना पक्षाने दिलेला उमेदवार शेख मंजुर असुन तो सर्व बाळासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्त्यांना मंजुर आहे. येणार्या विधानसभेच्या निवडणुकीत मोठ्या ताकदीने शेख मंजुर यांच्या पाठीमागे उभा करण्याचे आश्वासन दिले.

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार शेख मंजुर यानी माजलगाव मध्ये नगर परिषदेचे नगराध्यक्ष असताना विविध कल्याणकारी योजना राबवून केलेल्या विकास कामांची माहिती दिली. येणाऱ्या विधानसभेच्या अनुषंगाने माजलगाव मतदार संघातील धारूर तालुक्यातील घाट रुंदीकरणाचा प्रश्न असेल धारूर शहरातील पाणीपुरवठ्याची योजना असेल प्रभावी राबवण्याचे धारूरकरांना आणि तालुक्यातील जनतेला आश्वासन दिले. येणाऱ्या काळामध्ये धारूर तालुक्यातील उद्योगधंद्यांचा प्रश्न असेल सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न असेल विद्यार्थ्यांचा प्रश्न असेल अशा अनेक प्रश्नांना घेऊन आपण जर मला संधी दिली तर नक्कीच याची पूर्तता करण्याचे आश्वासन शेख मंजूर भाई यांनी बोलताना दिले. या बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष भारत तांगडे, सचिन उजगरे वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल भैय्या डोंगरे युवक जिल्हाध्यक्ष बाबुराव मस्के, माजलगाव तालुका अध्यक्ष संजय नाकलगावकर वडवणी तालुकाध्यक्ष अविनाश झोडगे समाधान गायकवाड, धम्मानंद साळवे धारूर तालुक्याचे महासचिव अभिजीत वावळ, अमोल बनसोडे बाळासाहेब उजगरे शहराध्यक्ष आकाश गायसमुद्रे, कपिल उजगरे, पप्पू उघडे सचिन ढोबळे ,उजगरे व आभार प्रदर्शन अभिजीत वावळ यांनी केले. या वेळी मोठ्या संख्येने तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

# परळीत विविध पक्ष आणि संघटनांच्या कार्यकर्त्यांचा धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेशाचा ओघ सुरूच

**एमआयएम युवक आघाडीचे शहराध्यक्ष उमर शेख यांसह असंख्य तरुणांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश**

**प्रतिनिधी । परळी**

विधानसभा निवडणुकीच्या तारखा जसजशा जवळ येत आहेत तसतसे राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात विविध पक्ष आणि संघटनांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा धनंजय मुंडे यांचे नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेशाचा ओघ प्रचंड वाढला आहे. एम आय एम पक्षाचे युवक आघाडीचे शहराध्यक्ष शेख उमर यांच्यासह एम आय एम चे युवक आघाडीचे पदाधिकारी व असंख्य कार्यकर्त्यांचा आज ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश संपन्न झाला. यावेळी वाल्मिक अण्णा कराड यांनी पक्ष प्रवेश देऊन सर्वांचे स्वागत केले व शुभेच्छा दिल्या.

यावेळी एमआयएमचे उमर शेख यांच्यासह



अरबाज पठाण, सोहेल शेख, आयान शेख, अजीम शेख, फिरोज शेख, तारीख शेख, ताहेर शेख, हमजा शेख, आमिर शेख, शहाबाज शेख, अरबाज शेख, लाला तांबोळी, जाहीर तांबोळी, सोहेल शेख, रोमन शेख, मुस्तकीन सय्यद, सय्यद निजाम, शेख समीर, मोजन शेख, शहाबाज पठाण, इरफान शेख, सोनू शेख, मुजफ्फर कुरेशी, पूर्वान पठाण, जाहीर पठाण, सोहेल खान, समीर पठाण, जुनेद शेख, रोहिन खान, मोजम कुरेशी, दनियल खान, सुलतान पठाण, आरिफ शेख, मेहबूब भाई, सलमान शेख, मुजाहिद शेख, तोफिक शेख, सय्यद साबीर, शेख इस्माईल, शेख फरीद, शेख अझहर, शेख अजीम, सय्यद राजू , अरबाज कुरेशी, अजहर कुरेशी, जुबेर खान, समीर खान, अर्षद शेख, नाझीरखान, आयान शेख, जावेद सय्यद, सय्यद गुलमाल, सय्यद सलमान, अरबाज खान, असलम कुरेशी, मोबीन खान, नसीर पठाण, शेख चांद, मुक्तार सय्यद, मुस्तकीन बागवान, दिशान बागवान यांसह असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

# बारा हजारांची लाच घेताना बालकल्याण समितीच्या सदस्याला रंगेहाथ पकडले

**प्रतिनिधी । गेवराई**

गेवराई : बीड शहरातील बाल कल्याण समितीतील सदस्याला सापळा रचून १२ हजारांची लाच घेताना एसीबी ने रंगेहात पकडले. बाल कल्याण समितीतील सदस्य असलेल्या सुरेश प्रभाकर राजहंस वय-४० वर्ष यास सोमवारी लाच घेताना रंगेहात पकडले तक्रारदार यांची मैत्रीण महिला बाल स्वाधार गृहात दाखल असून तिला तक्रारदार यांनी सोडवण्याकरिता दि.१० ऑक्टोबर रोजी अर्ज केला होता.त्यावरून सदरील मुलीला तक्रारदार यांचे ताब्यात देण्यासाठी बालकल्याण समितीचे सदस्य सुरेश राजहंस याने स्वतः करिता व समितीतील इतर सदस्य करिता ५० हजारांची लाच मागणी करून तडजोडी अंती १२ हजार रुपये घेण्याचे पंचा समक्ष मान्य केले . लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा कारवाई दरम्यान १२ हजार रुपये लाच रक्कम स्वतःघेताना सुरेश राजहंस यास बाल कल्याण समितीचे कार्यालयात लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडले.सध्या शिवाजी नगर ,बीड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप आटोळे,अप्पर पोलीस अधिक्षक मुकुंद आघाव,पोलीस उप अधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक युनूस शेख, पोलीस अंमलदार, भरत गारदे, अविनाश गवळी, गणेश मेहेत्रे यांनी केली.



**बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई**

# बीडमध्ये अंडर १९ क्रिकेट निवड चाचणी

**प्रतिनिधी । बीड**

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशन च्यावतीने अंडर १९ वयोगटातील संघ निवडीसाठी रविवार, दि.२७ ऑक्टोबर २०३४ रोजी सकाळी ९ वाजता बीड येथील मल्टीपर्पज ग्राउंडवर निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे.महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या अंडर १९ वयोगटातील निमंत्रितांच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी बीड जिल्हा संघ निवडीसाठी ही चाचणी होत आहे. पात्र खेळाडूंनी पूर्ण गणवेशात आधार कार्ड, जन्म प्रमाणपत्राच्या दाखला व प्रवेश शुल्कासह वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन बीड जिल्हा



क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख यांच्यावतीने करण्यात आले आहे.


# आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवा, जीवनात काहीच कमी पडणार नाही

**प्रतिनिधी । बीड**

**विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात शिक्षणाकडे लक्ष द्यावे. शालेय शिक्षणच स्पर्धा परीक्षेचा पाया आहे. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवा, जीवनात तुम्हाला काहीही कमी पडणार नाही, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले.बीड तालुक्यातील नागापूर (खुर्द) येथे श्री.संत सावता गणेश मंडळातर्फे आयोजित विविध स्पर्धा परीक्षांचे सोमवारी (दि.२१) बक्षीस वितरण पार पडले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ.दिपाताई क्षीरसागर ह्या बोलत होत्या.

प्रमुख पाहुणे म्हणून वाहेगाव येथील श्रीहरी विद्यालयाचे मुख्याध्यापक के.डी.राऊत, मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. हनुमान लव्हाळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश साळुंके, मा.सरपंच अर्जुन साळुंके, साळुंके, किशोर ठोकणे, पत्रकार चंद्रकांत साळुंके, चेअरमन लक्ष्मण साळुंखे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हनुमान साळुंके, धर्मा साळुंके, महेंद्र साळुंके, समाधान घोडके, परमेश्वर साळुंके, गोकुळ साळुंके यांनी मेहनत घेतली. शाम साळुंके यांच्या सुत्रसंचलनाने कार्यक्रमाची शोभा वाढवली. प्रास्ताविक नामदेव साळुंके केले. आभार प्रा.रखमा साळुंके यांनी मानले. यावेळी लहान मुलांमध्ये कमालीचा आनंद उत्साह दिसून आला. दरम्यान, गावातील ज्येष्ठ पोलीस पाटील हसन पठाण यांची डॉ.दिपाताईंनी भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली.



**माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांचे प्रतिपादन; नागापूर (खु.) येथे स्पर्धा परीक्षेचे बक्षीस वितरण**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे आष्टी तालुका युवक अध्यक्ष ऋषिकेश भैया दरेकर यांच्या हस्ते दौलवडगाव युवक गटप्रमुख पदी पिंपरी घाटा येथील शरद आमटे यांची निवड करण्यात आली व त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले यावेळी झांजे सर युवा कार्यकर्ते हनु आमटे दत्तू गायकवाड सोमीनाथ मुटके संदीप आमटे मच्छिंद्र शेळके मेजर प्रल्हाद आमटे नागेश आमटे बाळू आमटे प्रल्हाद भिसे आदी मान्यवर उपस्थित होते

छायाचित्र सुरेश कांबळे

# आचार्य टाकळी येथे कायद्याविषयक जनजागृती कार्यक्रमाद्वारे नागरिकांचे सक्षमीकरण

**परळी न्यायालयाचे. न्यायाधीश श्री. गणपा साहेब. यांनी मार्गदर्शन केले**

**प्रतिनिधी । सिरसाळा**

सोमवारी संध्याकाळी ठीक सात वाजता परळी न्यायालयाचे सरन्यायाधीश गणपा साहेब यांची हनुमान मंदिर आचार्य टाकळी येथे कायद्याविषयी ग्रामीण भागात सामान्य माणसापर्यंत कायद्याची माहिती पोहोचली पाहिजे यासाठी त्यांनी आचार्य टाकळी येथे शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचे आयोजक आमच्या गावचे एडवोकेट उमेश घोडके साहेब यांनी लोकांपर्यंत व तळागाळातील ग्रामीण माणसापर्यंत कायद्याची सविस्तर माहिती दिली यासाठी त्यांनी शिबिर घेण्याचे धाडस घेतले व त्यांच्या विनंतीला मान देऊन परळी न्यायालयाचे न्यायाधीश गणपा साहेब व त्यांच्याबरोबर परळी न्यायालयाचे न्यायाधीश. बोर्डे साहेब व गायकवाड साहेब उपस्थित होते यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला गणपा साहेबाचा सत्कार गावचे सरपंच रामभाऊ तात्या घोडके यांनी केला व परळी न्यायालयाचे न्यायाधीश. बोर्डे साहेबांचा सत्कार सेवा सोसायटीचे चेअरमन. तुकाराम आचार्य यांनी केला गायकवाड .साहेबांचा सत्कार उपसरपंच. अंगद जिजा आचार्य यांनी केला या कायद्याविषयी शिबिराला परळी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी साहेब व आचार्य टाकण्याचे ग्रामसेवक अनुसे साहेब उपस्थित होते. वकील संघाचे परळी न्यायालयाचे अध्यक्ष गिराम साहेब हे उपस्थित होते. परळी न्यायालयाचे न्यायाधीश. बोर्डे साहेबांचा विषय होता मोबाईल हा चांगला तेवढाच आहे आणि वाईट तेवढाच आहे यासाठी लहान मुलांना मोबाईलचा वापर कमी वेळेत पुरता करावा व त्यांच्या पालकांनी यावर लक्ष ठेवून मोबाईल



वापरण्यावर बंदी घालावी मोबाईल पासून विद्यार्थ्यांना बरेच मोठे परिणाम होऊ लागले आहे याची काळजी विद्यार्थ्यांनी घेतली पाहिजे या वेळेस आचार्य टाकळीचे जिल्हा परिषद शाळा व सरस्वती विद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी व गावातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते यामध्ये सर्वांना अशी कायद्याविषयी जनजागृती होईल अशी माहिती देण्यात आली परळी न्यायालयाचे सरन्यायाधीश गणपा साहेब यांनी कायदेविषय सविस्तर मांडणी करून बालविवाह व त्यांच्यावर क** कारवाई करावी यातले कायद्याविषयी माहिती दिली बालविवाह रोखण्यासाठी मुलीचं वय १८ वर्षे वय पूर्ण झालेला पाहिजे व मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण झाले पाहिजे यासाठी त्यांच्या आई-वडिलांची मोठी जबाबदारी आहे तिथे कुठे बालविवाह होत आहे ते रोखण्यासाठी कायदा १९१५ पासून अमलात आहे . बालविवाह असेल ते रोखण्याची जबाबदारी तुमची आहे यामध्ये कलम २३ नुसार त्या व्यक्तीला दोन. वर्षाची शिक्षा होऊ शकते व एक लाख रुपये दंड होऊ शकतो व तसेच मध्येशी करणाऱ्या व्यक्तीला सह आरोपी केले जाते याची माहिती परळी न्यायालयाचे सरन्यायाधीश गणपा साहेब .यांनी दिली कलम २३ नुसार गावातील कोणत्याही व्यक्तीला बालविवाह रोखता येतो व वय वृद्ध वडीलधाऱ्या माणसांना जर त्यांचे मुले संभाळ करीत नसतील तर त्या मुलाविरुद्ध पोटगी मागण्याचा अधिकार आहे.तर दोन-तीन महिने जर पोटगी दिली पुन्हा देत नसेल तर त्याला दुसरा अर्ज करता येतो एक महिन्याची पोटगी रुपली असेल तर एक महिना सजावू शकते दोन महिन्याची पोटभर उठले असेल तर दोन महिन्याची सभा होऊ शकते अशी तरतूद त्या कायद्यामध्ये आहे. देऊन सुद्धा सांभाळ करीत नसतील तर नतर त्यांना उप विभागीय अधिकारी परळी वैजनाथ येथे एक साधा अर्ज दिला तर त्या वृद्ध व्यक्तींना त्या मुलाकडून पोटगी घेण्यासाठी तीन महिन्याच्या आत पोटगी चे नियोजन केले जाते स्वतः वय वृद्ध व्यक्ती उप विभागीय अधिकारी कार्याला जाऊन अर्ज करावेत व तुमच्या अर्जाची शहानिशा ९० दिवसाच्या आत केली जाते असे मार्गदर्शन व्यक्तीची जन्म म्हणून किंवा मृत्यू नोंद असणं अत्यंत गरजेचे आहे पण सहजासहजी खेडेगावातील व्यक्ती ची नोंद जन्म नोंद ही नसते मृत्यूची नोंद नसते त्यामुळे पुढील मुलाबाळास वारसा चा फेर लावण्याकरिता मोठी अडचण निर्माण होते यासाठी कोणत्याही व्यक्तीची जन्माची नोंद किंवा मृत्यूची नोंद असणे गरजेचे असते जन्म झालेल्या बाळाची नोंद अंगणवाडी सेविका यांच्याकडे द्यावी व अंगणवाडी सेविका यांनी ग्रामपंचायतीचे सचिव ग्रामसेवक यांच्याकडे देण्यात यावी अशी माहिती दिली यावेळी उपस्थित ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब किरवले पुरुषोत्तम घोडके माऊली आचार्य दिगंबर काकडे जगन्नाथ घोडके बंडू झगडे बाबासाहेब गांगर्डे माणिक आचार्य श्रीराम आचार्य या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील आचार्य यांनी केले . कायद्याविषयक जनजागृती कार्यक्रमाद्वारे नागरिकांचे सक्षमीकरण व शिबिर घेण्यात आले यांचे संयोजक आमच्या गावचे एडवोकेट .उमेश भैय्या घोडके यांच्यामुळे परळी न्यायालयाची पूर्ण स्टीम या कायद्याविषयी माहिती सांगण्यासाठी आचार्य टाकळी येथे आले होते या कार्यक्रम संपल्यानंतर छोट्याशा अल्पशा आहाराची सोय करण्यात आली यावेळी सिरसाळा पोलीस स्टेशनचे बीट अंमलदार हनुमान मुंडे व वाघमारे साहेब यांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती.

# जि.प.मध्ये दर्जेदार शिक्षण सुविधा मिळाल्यामुळे अनेक विद्यार्थी पुणे जिल्ह्यामध्ये स्थिरावले आहेत- सुरेश धस

**मतदारसंघाप्रमाणेच पुण्यातही नागरिकांची गर्दी तर सर्वत्र धसांचे जंगी स्वागत**

**प्रतिनिधी । आष्टी**

आष्टी तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न घेऊन आपण राजकारणात आलो सरपंच मनापासून जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे लक्ष देऊन दर्जेदार शिक्षण घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे तात्कालीन पहिली ते सातवीतील असलेले विद्यार्थी आज पुणे जिल्ह्यामध्ये विविध क्षेत्रात स्थिरावले आहेत याचा आपणास अभिमान वाटत असून त्यांच्यासाठी काही करता आले याची समाधान वाटत आहे असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील मूळ रहिवासी असलेल्या पुणे जिल्ह्यातील नागरिकांच्या वाकड, रूपीनगर,हडपसर आणि रांजणगाव येथे आयोजित कौटुंबिक स्नेह मेळाव्यामध्ये ते बोलत होते.

पुढे बोलताना धस



म्हणाले की,पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रात आपल्याकडील लोक कार्यरत आहेत आयटी क्षेत्रात असतील व्यावसायिक क्षेत्रात असतील ड्रायव्हर क्षेत्रात देखील आपल्या भागातील मुले बहुसंख्येने आहेत जे की स्वतःची वाहने घेऊन या क्षेत्रात आलेली आहेत १९९९ पासून आज पर्यंत गोरगरिबांची शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेत असलेल्या घेत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाद्वारे दर्जेदार मिळावे यासाठी शैक्षणिक कार्यावर भर देत आलेलो आहे ज्यावेळेस मी पहिल्यांदा जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष झालो त्यावेळेस शिक्षकांचा तुटवडा आणि असलेल्या रिक्त जागा मला जाणवत होत्या त्यात तात्काळ भरण्यासाठी मी जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष असल्याने तत्कालीन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी मला या निर्णयासाठी सर्वाधिकार दिले आणि त्यावेळेस एक हजार शिक्षकांची मेगा भरती करण्याचे काम पहिल्यांदा मी केलं २००१ ते २००५ पर्यंत ही रमणी पॅटर्न लागू केला ३० टक्के गुणवत्ता असलेल्या शाळा त्या २००५ साली ६८.६०% पर्यंत गेल्या आणि याच कालावधीमध्ये असलेले पहिले ते सातवी वर्गातील मुलं आज आपल्याला पुणे जिल्ह्यात विविध क्षेत्रात काम करताना दिसत आहेत

# आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात रंगणार पवार विरुद्ध पवार सामना

## उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांची राजकीय व्यूहरचना

प्रतिनिधी । आष्टी

सध्या निवडणुकीचे पडघम वाजायला सुरुवात झाली आहे आचारसंहिता लागल्यापासूनच प्रत्येक जण मीच आमदार असे सोशल मीडियावर पोस्टर व्हायला व्हायला सुरुवात झाली आहे परंतु आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात आगामी विधानसभा निवडणुकीत विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे व माजी आमदार भीमराव धोंडे यांच्यात लढत झाली या लढतीत भीमराव धोंडे यांना पराभव स्वीकारावा लागला आमदार बाळासाहेब आजबे यांचा विजय झाला परंतु त्यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सुरेश धस यांच्यामुळेच पराभव पत्करावा लागल्याचे स्पष्टीकरण दिले त्यामुळे यावेळेस पवार विरुद्ध पवार अशी लढत पहावयास पास मिळण्याची शक्यता असून या दृष्टीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे यांना एबी फॉर्म दिल्याची चर्चा सुरू आहे व ती खात्रीलायक माहिती मिळत आहे त्यामुळे या मतदारसंघाकडे











महाराष्ट्राचे लक्ष लागणार असून दोन्हीही पवार एकत्र आहेत हा समज खोडून काढण्यासाठी अशी लढत झाल्यास राज्याचे राजकारण ढवळून निघणार आहे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे यांनी गेली त्यांच्या कालखंडात अनेक काम करत आहेत व मोठी यंत्रणा उभी करत चांगलेच पाहिजे व माजी मंत्री तथा विधान परिषदेचे माजी आमदार सुरेश आण्णा धस यांनीही आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात कोट्यावधीची कामे करून जनसामान्याची सेवा केली आहे हे सत्य आहे परंतु दरम्यान दरम्यान मतदारसंघात आमदार माजी सुरेश धस आमदार आजबे माजी आमदार माजी आमदार भिमराव धोंडे हे आमदार भाजप पक्षातच असल्याने उमेदवारी कोणाला द्यायची हा पेच मात्र आता भाजप पक्ष समोर उभा टाकला आहे त्यात शरदचंद्र पवार गटाचे इच्छुक उमेदवार माजी आमदार साहेबराव दरेकर नाना राम खाडे महेबुब शेख हेही तुतारीकडुन कडून इच्छुक आहेत परंतु तरी या पक्षाकडून कोणाला तिकीट मिळणार हा मोठा पेच निर्माण झाला आहे मध्यंतरी विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे यांनी जाहीर सभेत वक्तव्य केले की जर धोंडी यांना उमेदवारी मिळाली तर मी त्यांचे काम करण्यास तयार आहे असे ते बोलून गेले परंतु जर धोंड्यांना उमेदवारी मिळाली नाही आजबेंना मिळाली तर धोंडे काम करणार का हा प्रश्न आता अनुत्तरीत आहे भाजपमध्येही फूट पडली त्यामुळे पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे आमदार बाळासाहेब आजबे ,धोंडे यांच्या बाबतीत जरी संभ्रम निर्माण झाला असला तरी आजबे , भिमराव धोंडे ,आतून एकच असल्याचे बोलले जाते नामदार अजित पवार यांनी जरी बाळासाहेब आजबे यांना एबी फॉर्म दिल्याचे चर्चा झाली असली तरी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाची जागा वाट्याला कुणाला उमेदवारी मिळणार याकडे मतदारांचे लक्ष लागून राहिले आहे यासाठी उमेदवाराची चाचणी सुरू आहे भाजपात कोणाला उमेदवारी मिळणार नाहीच मिळाली तर कोण अपक्ष राहणार याकडे सध्या लक्ष लागून राहिले आहे तर अनेक जण गुडघ्याला बाशिंग बांधून उमेदवारीसाठी भाऊ गर्दी करत आहेत उमेदवारी मिळवण्यासाठी राजकीय व्यूहरचना ही आखली जात आहे कोणती जागा कोणाला मिळणार उमेदवारीचा पत्ता कोणाचा कट होणार याचा आतापासूनच राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागले आहेत

# संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटलांनी अँड.स्वप्नील भैय्या गलधराना

**बीड विधानसभेची उमेदवारी जाहीर करावी:- एम एस गोलू, किरण गाडीवान उमेश थोरात, सौरभ निंबाळकर.**

प्रतिनिधी । बीड

भारतीय जनता पार्टीची सत्ता, असताना तालुकाध्यक्ष पद असतानाही मराठा आरक्षणासाठी व मराठा समाजाच्या आत्महत्या होत असल्यामुळे या पदाला व सत्तेला फक्त मराठा आरक्षणासाठी लाथ मारून राम राम ठोकणारा बीड जिल्यातील एकमेव मराठा सेवक व युवक नेतृत्व

अँड.स्वप्नील भैय्या गलधर हे होते यांनी गेल्या अनेक वर्षापासून मराठा आरक्षण चळवळीमध्ये व मराठा समाजाच्या विविध आंदोलनामध्ये सहभागी असताना बीड वासिया यांनी पाहिले आहे मराठा आरक्षणासाठी भारतीय जनता पार्टीमध्ये राहून न्याय मिळत नसल्यामुळे एक वर्षापासून जरांगे पाटलांबरोबर प्रत्येक आंदोलनामध्ये सहभागी होऊन स्वता सर्व जिम्मेदारी घेऊन व समाजासाठी अनेकांना अंगावरही घेतला आहे अशा या युवकाला









जरांगे पाटलांनी उमेदवारी देऊन तरुण नेतृत्वाला बीड विधानसभा मध्ये नेतृत्व करण्याची संधी द्यावी अशी मागणी सर्व सामान्य जनतेची इच्छा आहे. व स्व. अमोल भैय्या गलधर युवा मंच च्या सर्व सदस्यांनी केली आहे अँड.स्वप्निल भैय्या गलधर यांचे मोठे बंधू कै.अमोल भैय्या गलधर यांनी मराठा महासंघामध्ये अनेक वर्षे मराठा आरक्षणाच्या लढ्यामध्ये काम केलेलं होते व बीड रेल्वे साठी महाराष्ट्र मध्ये असे कोणी आंदोलन केले नाही असे सर्वात प्रथम टॉवर वर चढून व रेल्वे साठी जेल मध्ये जाणार एकमेव ढाण्या वाघ होता त्यामुळे स्व. अमोल भैय्या गलधर यांना आदरांजली म्हणून बीड मतदारसंघामध्ये जरांगे पाटलांनी अँड.स्वप्नील भैय्या गलधर सारख्या तरुण तडफदार चेहऱ्याला आमदारकीची संधी दिली तर आमदार करण्यासाठी भैय्यांसोबत रात्रंदिवस मतदार संघामध्ये सहभागी होईल असे आव्हान एम एस गोलू, किरण गाडीवान किरण गाडीवान उमेश थोरात, सौरभ निंबाळकर. व स्व. अमोल भैय्या गलधर युवा मंच बीड जिल्हा

# जगदीश (भैय्या) गुरखुदे यांना भारतीय जनता पार्टीच्या जिल्हाध्यक्ष पदी निवड करा- प्रमोद (भैय्या) ठोंबरे

प्रतिनिधी । बीड

येथील भारतीय जनता पार्टीचे लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचे विश्वासू व निकटवर्तीय समजले जाणारे व सध्याचे बीड शहराध्यक्ष यांनी आदरणीय गोपीनाथजी मुंडे साहेबांच्या पश्चात मा. आ. पंकजा मुंडे व खा. प्रितमताई मुंडे यांध्यासोबत गेल्या अनेक वर्षापासून तनगन धनाने बीड शहराच्या विकासासाठी व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात्साठी मा. आ. पंकजताई मुंडे व खा. प्रितमताई मुंडे यांना जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांचे हात मजबुत व बळकट करण्याचे काम अगदी सचोटीने व प्रामाणिकपणे केले आहे. अशा एकनिष्ट व प्रामाणिक व्यक्तीच्या हातामध्ये जर भारतीय जनता पार्टीचे वलय निर्माण करण्यासाठी मा. जगदीश (भैय्या) गुरखुदे यांना भारतीय जनता पार्टीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी नियुक्त करण्याची मागणी सर्वसामान्य बीड जिल्हा वासियांची असून त्यांना बीड जिल्हाध्यक्ष पदाची जिम्मेदारी पक्षश्रेष्ठींनी द्यावी असे प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात भाजपाचे युवानेते प्रमोद (भैय्या) ठोंबरे यांनी मागणी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केली आहे.



# राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी पुन्हा रूपालीताई चाकणकर यांची निवड

**अन्यायग्रस्त महिलांना न्याय मिळवून देणाऱ्या नवदुर्गा म्हणजे रूपाली ताई चाकणकर**

प्रतिनिधी । जातेगांव

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या रूपालीताई चाकणकर यांची दुसऱ्यांदा नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. गोरगरीब, अन्यायग्रस्त, अत्याचारीत , पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी अविरतपणे सहकार्य करणाऱ्या रूपाली ताई चाकणकर यांना हे पद दुसऱ्यांदा देऊन त्यांच्या या नारी सेवेचा गौरव करण्यात आला असून गेल्या तीन वर्षांत त्यांनी असंख्य महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला वाच्या फोडून त्यांना तात्काळ न्याय मिळवून देण्यासाठी अनमोल सहकार्य केले आहे.त्यांना हे पद पुन्हा मिळाले आहे कारण त्यांनी त्यांच्याकडे आलेल्या महिलांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेऊन त्यांचा निपटारा केल्यामुळे त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊनच हे पद त्यांना मिळाले आहे. हे पद हे त्यांनी पिडीत



महिलांना न्याय व आत्मसन्मान मिळवून दिल्यानेच या कार्याची दखल घेऊनच मिळाले आहे.त्यांना हे पद मिळाल्याने या सामाजिक कार्याची पोच पावतीच मिळाली आहे. यामुळे त्यांच्या या सामाजिक कार्याला पुन्हा उजाळा मिळाला आहे पुढेही त्या अखंडपणे संकटग्रस्त व अन्यायग्रस्त, दुःखीत, पिडीत महिलांना सहकार्य करतील यात शंका नाही त्यांना पुढील वाटचालीसाठी आभारभर शुभेच्छा...!

रूपाली ताई चाकणकर यांचे एकनिष्ठ कार्यकर्ते शेख मेहराज

रूपाली ताई चाकणकर यांच्या महिला सेवा व समाजसेवेच्या सत्कार्यात खारीचा वाटा उचलणारे बीड शहरातील समाजसेवक युवानेते शेख मेहराज हे त्यांचे निष्ठावंत, निस्वार्थ सेवा करणारे, निष्कलंक, निस्पृह , म्हणजे शेख मेहराज हे आहेत. रुपाली ताई चाकणकर यांना दुसऱ्यांदा महिला आयोगाचे अध्यक्षपद मिळाल्याने या सच्या व प्रमाणिक कार्यकर्त्यांचा आनंद द्विगुणित झाला असून ते पुन्हा रूपालीताई चाकणकर यांच्या समाजसेवत सहभागी होऊन त्यांना सहकार्य करणार आहेत...

रूपालीताई चाकणकर यांची महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्थानिक गुन्हे शाखा-बीड कामगिरी मोटार सायकल चोरी करणाऱ्या

## एक आरोपीस स्थागुशा बीड यांनी केले जेरबंद करुन दोन मोटार सायकल गुन्हे आणले उघडकीस

प्रतिनिधी । बीड

मा पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी मोटार सायकल चोरीचे जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहे. त्यावरून मा.पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी मोटार सायकल चोरी करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदर्शन करून आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने पो.स्टे.पेठ बीड गुरनं १८३/२०२४ क.३०३(२) इछड या गुन्हयातील बुलेट चोरीचा तपास करीत असतांना दिनांक १९/१०/२०२४ रोजी पोलीस पोउपनि श्री. सिध्देश्वर मुरकूटे यांना सदर बुलेट समर्थ विनोद काळे रा.चंदन आरकेड छ.संभाजीनगर याने चोरल्याची गोपनिय माहिती मिळाली तेव्हा तात्काळ मा.पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख




स्था.गु.शा.यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथक रवाना होवुन आरोपी नामे समर्थ विनोद काळे वय२३ रा. चंदन आरकेड छ.संभाजीनगर यास ताब्यात घेवुन त्याचेकडुन गुन्हयात चोरीस गेलेली मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे. तसेच त्याचेजवळ आणखीन एक मोटार सायकल सायकल मिळुन आली तपास केला असता सदर मो.सा. पो.स्टे.शिवाजीनगर(मुंबई शहर) गुरनं ३२४/२०२२ कलम ३७९ भादंवि मधील चोरीची असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपीकडुन आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन आरोपी व दोन मोटार सायकल असा एकुण १,४०,०००/- चा मुद्देमाल जप्त केले आहे.आरोपीस पो.स्टे. पे बीड यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन पुढील तपास पो.स्टे.पेठ बीड करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री. उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्री. सिध्देश्वर मुरकूटे, सफौ/ तुळशीराम जगताप, पोह/मनोज वाघ,

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT